*कार्यालय पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर*
*2 रा माळा प्रशासकीय इमारत क्र. 1, सिव्हील लाईन्स, नागपूर*
*दुरध्वणी क्र. 0712 2561520 ईमेल आयडी* spacbnagpur@mahapolice.gov.in

# प्रेसनोट

## **Dy. R.T.O.**, गोंदिया यांचेविरूध्द **A.C.B.** नागपूर पथकाने केली यशस्वी सापळा कारवाई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर येथे तक्रारदार यांनी समक्ष येवून तक्रार नोंद केली की, तक्रारदार यांना आरोपी क्र. २) श्री राजेश रामनिवास माहेश्वरी (खाजगी इसम) यांनी तक्रारदार यांची पश्चिम बंगाल येथून खरेदी केलेले जेसीबी वाहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया (RTO Gondia) येथे नोंदणी करणेकरिता लागणारे शासकीय शुल्काव्यतिरिक्त आरोपी क्र. १) राजेंन्द्र सदाशिव केसकर, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी (अतिरिक्त प्रभार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी), उप प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया यांचेकरिता ७०,०००/- रू. लाचेची मागणी करीत आहे. तक्रारदार यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर (ACB Nagpur) येथे तक्रार दिली. तक्रारदार यांचे तक्रारीवरून सापळा कारवाई केली असता **लाचेची मागणी पडताळणी कारवाई** दरम्यान श्री राजेश रामनिवास माहेश्वरी (खाजगी इसम) यांनी तक्रारदार यांची पश्चिम बंगाल येथून खरेदी केलेले जेसीबी वाहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया येथे नोंदणी करणेकरिता लागणारे शासकीय शुल्काव्यतिरिक्त आरोपी क्र. १) राजेंन्द्र सदाशिव केसकर, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी (अतिरिक्त प्रभार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी), उप प्रादेशिक परिवहन कार्यालय गोंदिया यांचेकरिता ७०,०००/- रू. लाचेची मागणी केली. तसेच आलोसे श्री राजेंन्द्र सदाशिव केसकर, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची पडताळणी केली असता त्यांनी श्री राजेश रामनिवास माहेश्वरी (खाजगी इसम) यांच्या लाच मागणीस प्रोत्साहन दिले. दिनांक ०४/१२/२०२५ रोजी **सापळा कारवाई दरम्यान** तक्रारदार यांचेकडून श्री राजेश रामनिवास माहेश्वरी (खाजगी इसम) यांनी उपरोक्त नमुद काम करून देण्याचे मोबदल्यात ७०,०००/-रू. लाच स्वत: स्विकारल्याने नमुद दोन्ही आरोपींविरूध्द पोस्टे गोंदिया ग्रामिण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७अ, १२ अन्वये गुन्हा नोंद करून गुन्हयाचा तपास सुरू आहे.

सदर गुन्हयातील आरोपी लोकसेवक श्री राजेंन्द्र सदाशिव केसकर, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे घरझडती घेतली असता पुणे येथील राहते घरात रोख रक्कम ६,६६,०००/-रू. तसेच सोने चांदीचे दागिण्यांसह स्थावर आणि जंगम मालमत्ता मिळून एकुण ४ कोटी २५ लाख रूपयांचा मुद्येमाल मिळून आलेला आहे.

सदरची कारवाई डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर, श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक श्री जितेंन्द्र वैरागडे, मपोहवा अस्मिता मेश्राम, करूना सहारे, नापोशि सारंग बालपांडे, पोशि होमेश्वर वाईलकर, प्रफुल भातुलकर, चालक राजेन्द्र जांभुळकर यांनी केलेली आहे.

नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (ऐजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशिर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे संपर्क साधावा. तक्रारदारांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदारांचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

**<u>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा</u>**

**१.** पोलीस अधीक्षक कार्यालय दुरध्वणी क्र. ०७१२-२५६१५२०,
**२.** टोल फ्री क्रमांक : १०६४, व्हॉट्सअॅप क्र. ९०६७६७१०६४
**३.** डॉ. दिगंबर प्रधान, पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१८५५६६
**४.** श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ७०३८४३६४४१
**५.** श्री. विजय माहुलकर, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९९२३१४२५६९
**६.** श्री. राजीव कर्मलवार ,वाचक पोलीस निरीक्षक, लाप्रवि नागपूर मो.क्र. ९०२१४५२७६०